नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १६/०३/२०२५ (मंगळवार ) सकाळ**

## पारडसिंगा ता. काटोल येथे विधीसेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळाव्यात करण्यात आली सायबर गुन्हे,तीन नविन कायदे,वाहतुक नियम, महीला तक्रार निवारण तसेच विविध पोलीस/आपत्कालीन हेल्पलाईन बाबत जनजागृती

आज दिनांक १६/०३/२०२५ रोजी श्री सती अनुसया माता देवस्थान, पारडसिंगा येथे उच्च न्यायालय विधी सेवा उपसमिती नागपुर ,जिल्हा विधीसेवा प्राधिकरण नागपुर, जिल्हा प्रशासन नागपुर,तालुका विधीसेवा समिती, काटोल यांच्या संयुक्त विदयमाने विधीसेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा आयोजित करण्यात आला होता. सदर मेळाव्यात मा श्री विपीन इटनकर,जिल्हाधिकारी ,नागपुर, मा.न्यायमुर्ती श्री नितीन सांबरे, मा.न्यायमुर्ती श्री अभय मंत्री, मा. न्यायमुर्ती श्री दिनेश सुराणा, श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्यासह इतर मान्यवर हजर होते.सदर मेळाव्यात विविध शासकीय कार्यालया मार्फत स्टॉल लावुन शासकीय योजनांबाबत माहीती, आरोग्य तपासणी तसेच शासकीय योजनांच्या लार्भार्थ्यांना मान्यवारांच्या हस्ते लाभ देण्यात आला. सदर कार्यक्रमात मा श्री हर्ष ए. पोद्दार , पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात १. सायबर पोलीस स्टेशन, नागपुर ग्रामीण २.भरोसा सेल, नागपुर ग्रामीण आणि ३. जिल्हा वाहतुक शाखा, नागपुर ग्रामीण यांनी मेळाव्यात आलेल्या जनतेला माहीती देवुन जनजागृती केली. सायबर पोलीस स्टेशन,नागपुर ग्रामीण यांनी सायबर गुन्हयाबाबत जगजागृती संबधीत व्हिडीओ दाखवुन, हेल्प लाईन क्रमांक १९३०, बेवसाईट cybercrime.gov.in बाबत माहीती तसेच सायबर गुन्हयांबाबत जनजागृती पत्रिका वाटुन महीती दिली तसेच **तीन नविन कायदे भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, भारतीय साक्ष अधिनियम या कायदयांबाबत सुध्दा व्हिडीओ दाखवुन जनजागृती करण्यात आली.** भरोसा सेल, नागपुर ग्रामीण यांनी महीलांच्या सुरक्षेकरीता हेल्पलाईन क्र १८१/१०९१,चाईल्ड लाईन क्र १०९८, पोलीस हेल्प लाईन क्र ११२, जेष्ठ नागरिक सुरक्षा हेल्प लाईन क्र १४५६७ याबाबत माहीती, भरोसा सेल चे कामकाज, पती पत्नीचे समुपदेशन करून तक्रार निवारण करणे बाबत,

महीला व मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टीने नागपुर ग्रामीण जिल्हयात तैनातीस असलेले दामीनी पथक बाबत महीती, हेल्पलाईन बाबत जनजागृती पत्रिका वाटप करून जनजागृती केली. जिल्हा वाहतुक शाखा, नागपुर ग्रामीण यांनी वाहतुकीचे नियम, रस्ता सुरक्षा नियम, चांगला समिरीटन कायदा, वाहतुकीबाबत जनजागृती तसेच वाहतुक नियमांबाबत जनजागृती पत्रिका वाटप करून जनजागृती केली. सदर मेळाव्यात नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांच्या वतीने  वाहतुकींच्या नियमांबाबत आणि बालकांच्या लैगिक अत्याचार आणि बालकांचे लैगिंक अत्याचारापासुन संरक्षण अधिनियम २०१२ बाबत दोन जगजागृती पथनाटय सादर करण्यात आले आणि **काटोल पोलीस स्टेशन यांनी चोरीच्या गुन्हयात तपासादरम्यान हस्तगत केलेल्या ५ मोटर सायकल त्यांच्या मुळ  मालकांना मान्यवांराच्या हस्ते परत करण्यात आल्या.**




सायबर पोलीस स्टेशन
नागपूर ग्रामीण पोलीस
FAKE
Nagpur Gramin Police
सायबर पोलीस
नागपूर ग्रामीण पो




पोलीस विभाग
SaveLIFE
FOUNDATION




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर